REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 6 | MARCH - 2017

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार

प्रा. श्रीरंग शामराव लोखंडे
राज्यशास्त्र विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

## प्रस्तावना -

आधुनिक भारताच्या निर्मितीच्या ज्या महान नेत्यांनी आपले जीवन समर्पित करून आपल्या कर्तृत्वाने मोलाची भूमिका निभावली आहे त्यामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख अग्रमक्रमाने घ्यावा लागतो. भारताच्या निर्मिती डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका राष्ट्रनिर्मात्याची आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाची छाप त्यांच्या कार्यातून दिसून येते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकारण, संविधान निर्मिती, सामाजिक सुधारणा,



संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, कामगार कल्याण, कृषी विकास अर्थ, यासारख्या अनेक क्षेत्रात काम दिसून येते. परंतु तरीही त्यांच्या प्रमुख भर देशाचा आर्थिक विकास होता. स्वातंत्र्यपूर्व ब्रिटिश कालखंडात त्यांनी कृषी क्षेत्राचा विकासासाठी ब्रिटिश शासनाकडे अनेक सुधारणात्मक मागण्या केल्या आहेत. देशाच्या आर्थिक विकास साध्य करण्यासाठी सामाजिक सुधारणा व कृषी क्षेत्राचा विकास होणे त्यांना अपेक्षित होते. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी ग्रामीण विकास, शेतमजुरांचा विकास, कामगारांचा विकास घडवूण आणण्यासाठी त्यांनी अनेक योजना विविध कार्यक्रम राजकीय निर्णय घेतले आहे. आपल्या लिखाणातून व भाषणातून आपले विचार समाजापर्यंत पोहोचवण्याचे निरंतर काम त्यांनी केले आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या राज्यघटनेची निर्मिती करून स्वतंत्र भारताच्या प्रजासत्ताक लोकशाहीला आर्थिक विकासाची एक निश्चित दिशा देण्याचे महान काम केले आहे.

## उद्देश –

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी विषयक विचार माहित करणे.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषीविषयक नियम निर्णय माहित करणे.

### गृहीतके -

१. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकरी विकसावर भर दिला आहे.

२. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी कृषी विकासासाठी विविध निर्णय घेतले आहेत.

### संशोधन विषयाची निवड -

वर्तमान काळात भारतीय अर्थव्यवस्था जगातील एक विकसनशील अर्थव्यवस्था आहे. आज भारत १३५ कोटी लोकसंख्येची अन्नधान्याची गरज भागवण्यात स्वयंपूर्ण झाला आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारतानेने २१ व्या शतकात ओळख निर्माण केले आहे व याची पायाभरणी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केली आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विविध क्षेत्रात कार्य दिसून येते. परंतु फक्त कृषी विकासासाठी योगदान व कार्य माहिती माहीत करून घेण्याच्या उद्देशाने उद्देशाने संशोधकांनी सदर विषयाची निवड केली आहे.

### तथ्य संकलन -

संशोधकाने प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी प्रामुख्याने दुय्यम साधनसामग्रीचा वापर केला आहे. यामध्ये संशोधकाने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विविध ग्रंथ, वर्तमानपत्रातील विविध लेख, विविध सभांमधील भाषणे, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्यावर प्रकाशित विविध समीक्षात्मक ग्रंथ इत्यादी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करून संशोधन विषयाची माहिती प्राप्त केली आहे.

प्रत्येक देशाच्या आर्थिक विकास हा कृषी क्षेत्रावर अवलंबून असतो. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी कृषी विकास आर्थिक विकासाची गुरुकिल्ली मानले आहे. भारतातील तत्कालीन समाज व्यवस्था चातुर्वर्ण होती. भारतीय समाज व्यवस्थेतील श्रेणीबद्ध विषमते दलित वंचित शेतकरी दुर्बल समाज भरडला जात होता. भारतातील बहुसंख्य दलित गरीब वंचित समाज प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे कृषी क्षेत्राशी जुळलेला असल्याने डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना शिक्षण घ्या, ज्ञान प्राप्त करा, व्यवसाय करा, स्वाभिमानाने जगा असे आवाहन केले आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी कृषी क्षेत्राच्या विकासासाठी सिंचन, वीजनिर्मिती, कृषी संशोधनाची उपलब्धता मजुरांचे प्रश्न या प्रमुख बाबींवर भर दिला. आहे ब्रिटिश काळात जलसंपदा मंत्री असताना कृषी क्षेत्राला जलसिंचन व विजेची पुरेशा प्रमाणात व्यवस्था न केल्यास देशाच्या अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ करणे शक्य नाही असे त्यांचे मत होते. बंगाल बिहार प्रांतात वाहणाऱ्या ‘दामोदर खोरे’ नदीवर धरणे बांधून जलसिंचनाच्या दामोदर खोरे प्रकल्पाचे त्यांनी जोरदार समर्थन केले आहे. तसेच ‘हिराकुड प्रकल्प’ प्रकल्प याचेही त्यांनी समर्थन केले आहे. जल व्यवस्थापनाच्या क्षेत्रातही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी महत्वाचे विचार मांडले आहेत. १९४२ ते ४६ या काळात मजूर मंत्री असताना बांधकाम, पाटबंधारे, ऊर्जा अशा नव्याने निर्माण करण्यात आलेल्या खात्यांचे कार्यभार पाहत असताना महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत त्या प्रकल्पाचे फायदा आजही भारताला होत आहे.

## स्वतंत्र मजूर पक्ष व शेतकरी विकासाचा जाहीरनामा –

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकऱ्यांच्या उतथ्यानाचे फक्त विचार विचारच मांडले नाहीत तर त्यांना कृषीशील कार्यक्रमाची जोडही दिली आहे. १० मार्च १९३८ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षातर्फे पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील असंघटित शेतकरी व शेतमजुरांचा मुंबईच्या असेब्ली हॉलवर २० ते पं२५ हजार शेतकऱ्यांचा मोर्चा काढला होता. त्या मोर्चाकडून पुढील मागण्या शासनाकडे करण्यात आल्या.

१. शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण करणारी परंपरागत खोत पद्धत बंद केली पाहिजे व शासन व शेतकरी यातील मध्यस्थानाचे उच्चाटन केले पाहिजे.

२. शेतकऱ्यांना स्वतंत्रपणे सुखी संपन्न जीवन जगण्यासाठी जमिनीची प्रत्यक्ष मशागत करणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या मेहनतीप्रमाणे मोबदला मिळाला पाहिजे.

३. जमीन महसूल व शेतसाराची वसूल वसुली करण्यापूर्वी शासनाने शेतकऱ्यांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्याची सोय करावी.

४. शेतमजूर म्हणून काम करणाऱ्या मजुरांच्या किमान म मजुरी दराचे कायद्याने संरक्षण करणे.

५. जमीन महसूल कायद्यात दुरुस्ती करणे.

६. जमिनीचे किमान उत्पन्न ठरवून त्यापेक्षा कमी उत्पन्न प्राप्त झाल्यास शेतासाराची रक्कम माफ करणे.

७. तीन वर्षापेक्षा अधिक काळ शेतजमीन कसणाऱ्या कुळांना कायम कुळ समजण्यात यावे.

८. सावकारी व्यवसायाला कायद्याने बंधने करण्यात यावीत.

९. सर्व खेडे गावांना पशुपालनासाठी व गुरांच्या चारासाठी गावालगत चराई रान राखीव असावीत.

१०. लहान सीमांत शेतकऱ्यांची सिंचनाची पाणीपट्टी ५० टक्क्यांनी कमी करावी.

११. देशातील सर्व पडीत लागवडीयोग्य जमीन उपरी शेतकऱ्यांना मोफत उपलब्ध करून देण्यात यावी.

डॉ बाबासाहेब आंबेडकर एक कृतीशील तत्वचिंतक म्हणून ओळखले जातात. शेतीच्या प्रगतीसाठी बँक बँक सहकारी पतपढ्या स्थापना स्थापण्यासाठी मजूर पक्षामार्फत त्यांनी प्रयत्न केले आहेत. शेतजमिनीचे वाढते तुकडीकरण व जमिनीवर अवलंबून राहणाऱ्या लोकसंख्येचे वाढते प्रमाण यातून दारिद्र्य बेकारी उपासना समस्या निर्माण होतात. या समस्या सोडविण्यासाठी शेतीला जोडव्यवस्था व शेतीपूरक उद्योग व्यवसायाची सोय करणे गरजेचे आहे असे त्यांचे मत होते. शेतकरी व शेतमजूर यांच्या समस्या सोडवण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्ष मार्फत काम केले आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकऱ्यांमध्ये आत्मसन्मानाची जाणीव निर्माण करून शेतकऱ्यांवरील विविध अन्याय आर्थिक परिस्थिती विशद करून त्याविरुद्ध लढण्याची दिशा दिली आहे.

## सारांश -

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना देशाच्या सर्वांगीण विकास अपेक्षित होता. कारण देशाचा सर्वांगीण विकासातूनच देशातील बहुजन, वंचित, उपेक्षित घटकांचा विकास साध्य होणार होता. बहुजन शेतकरी वर्गाला विकासाच्या मध्यवर्ती प्रवाहात आणण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्षमार्फत अनेक कार्यक्रम व कामे त्यांनी केले आहेत. ब्रिटिश काळात व स्वतंत्र्योत्तर काळात विविध पदांवर काम करताना विविध लेख सभांमधील भाषणे व लिखाणातून

शेतकरी वर्गाला न्याय देण्याचे काम त्यांनी केले आहे. २१व्या शतकात भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील अनेक आव्हाने आर्थिक समस्या आहेत. या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी पुन्हा एकदा विधायक परिस्थिती निर्माण करण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे मूलगामी विचार संजीवनी ठरू शकतात.

## संदर्भसूची -

१. संपादक प्रदीप गायकवाड डॉ बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा कामगार चळवळ डॉ बाबासाहेब आंबेडकराची भाषणे, क्षितिज प्रकाशन नागपूर

२. संपादक डॉ गंगाधर पानतावणे, डॉ बाबासाहेब आंबेडकर शेतसाराचा प्रश्न, डॉ आंबेडकरांचे निवडक लेख, प्रतिमा प्रकाशन पुणे

३. डॉ बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, डॉ बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

४. डॉ दिनकर हेलेरकर, डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विरोधक आनंद प्रकाशन औरंगाबाद.